**<u>नियमीत दिवाणी दावा क्र.२३३/२०१९</u>**

**<u>त्र्यंबक वि. रसुल</u>**

**<u>नि.क्र.३९</u>**

**<u>वादीतर्फे सा.क्र.१ यांचा शपथेवर पुढील सरतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री.आर.टी.काकडे :-</u>**

मी या दाव्याच्या कामी गट क्र.४२ सुनवळा या जमिनीचे ७/१२ चे उतारे सन १९९४ ते सन २०१७ पर्यंतचे चार उतारे दाखल केलेले आहेत. मला ते दाखवले, ते तेच आहेत, त्याला अनुक्रमे **नि.क्र.४१** ते **४४** देण्यात येतो. मी मुद्रीकाबाई नामदेव नागरगोजे यांच्याकडून सोनवळा येथील गट क्र.४२ ही जमीन खरेदी केलेली होती. ३८ आर. जमिनीच्या खरेदीची प्रमाणबद्ध केलेली खरेदीची प्रत मी दाव्याच्या कामी दाखल केली आहे. आता मला ती दाखवण्यात आली, व्यावर खरेदी घेणार व देणार यांच्या सह्या असून, त्यातील मजकूर बरोबर आहे, त्याला **नि.क्र.४५** देण्यात येतो. मी खरेदीचा फेरफार क्र.१३९६ या दाव्याच्या कामी दाखल केला आहे. मला तो दाखवला, तो तोच आहे, त्याला **नि.क्र.४६** देण्यात येतो. मी दुसरे खरेदीपत्र याच गटाचे दाखल केलेले आहे. रामराव मनसिंगा नागरगोजे यांच्या कडून मी २० आर क्षेत्र खरेदी केलेले होते. त्याचे प्रमाणबद्ध प्रत मी या दाव्याच्या कामी दाखल केली आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर देणार व घेणार यांच्या व साक्षीदार यांच्या सह्या आहेत. त्याला **नि.क्र.४७** देण्यात येतो.

सरतपास पूर्ण.

नियमीत दिवाणी दावा क्र.२३३/२०१९
त्र्यंबक वि. रसुल
नि.क्र.३९

**साक्षीदार यांचा शपथेवर उलटतपास प्रतिवादी क्र.१ ते ७, १०, ११, १७ ते २१ तर्फे विधिज्ञ श्री.बी.के.गाडगे यांना पुकारले असता गैरहजर त्यामुळे प्रतिवादी क्र.१ ते ७ तर्फे उलटतपास नाही :–**

**प्रतिवादी क्र.८ यांच्याविरुद्ध दावा एकतर्फी असल्याने उलटतपास नाही.**

**साक्षीदार यांचा शपथेवर उलटतपास प्रतिवादी क्र.९ व १२ ते १५ विधिज्ञ श्री.एस.बी.हाळीकर :–**

मुद्रीकाबाई हिने तिच्या दिराकडून जमीन घेतल्याचे माझ्या माहितीत आहे. मी मुद्रीकाबाईच्या नावचा बयनामा पाहिलेला आहे. जो बयनामा मी पाहिला तो नोंदवलेला होता किंवा नाही हे मी पाहिलेले नाही. मुद्रीकाबाई हिने २० पैश्याचे तिकीट कागदावा चिकटावून त्यावर बयनामा करून घेतला होता व त्याद्वारे फेरफार क्र.३३२ नोंदवला गेला का काय हे मला माहीत नाही. दि.१९/०८/१९९३ ला आर.टी.एस. अपिल क्र.१९८६/आर.वो.आर./८७ द्वारे मुद्रीकाबाईचे नाव मालक सदरातून काढून टकण्यात आले होते का काय हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मुद्रीकाबाई ही मालक नसताना मी तिच्याकडून खरेदीखत करून घेतले. विठ्ठलने ८/२०१४ चा दावा माझ्या विरुद्ध दाखल केला होता. तो माझ्या विरूद्ध निकाली झाल्याने मी त्यात अपिल केलेल आहे. हे म्हणणे खरे नाही

**नियमीत दिवाणी दावा क्र.२३३/२०१९**
**त्र्यंबक वि. रसुल**
**नि.क्र.३९**

की, मी मुद्रीकाबाईकडून घेतलेल्या खरेदीपत्राने दावा मिळकतीचा मालक व कब्जेदार नाही.

हे म्हणणे खरे आहे की, विठ्ठलची जमीन माझ्या जमिनीला लागून नाही. हे म्हणणे खरे नाही की, अनुसयाबाई, गयाबाई, लक्ष्मीबाई यांचा दावा मिळकतीशी संबंध नसताना मी त्यांना विनाकारण पार्टी केले आहे. मी प्रतिवादी क्र.१ ते ७ यांच्या विरुद्ध वाद असल्याने दावा दाखल केला. इतर लोक सहधारक असल्याने त्यांना मी दाव्यात सामील केले.

उलटतपास संपला.

पुनःतपास नाही.

**श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत**

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by VIJAY RAMCHANDRA GHARAL
Date: 2025.08.01 17:40:59 +0530

**( श्री. व्ही. आर. घराळ )**

**ठिकाणः उदगीर** — **सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,**

**दिनांकः– ०१/०८/२०२५** — **उदगीर.**